## ॥ श्री ॥
## ॥ बाबा ॥
## पोषाख

मध्यरात्री निद्रेमध्ये स्वप्न दिसे मजला
जैसा बाळकृष्ण सजला ॥
कृष्णाचा तो वर्ण सावळा
कंठमध्ये वैजयंती माळा ॥
हातामध्ये शंख आगळा
मोर मुकुट फुलला ॥1॥

घेऊन हातामध्ये लाडवाची वाटी
धावे सतत गोप्यापाठी
कोणी म्हणे गोपाळा त्यासी
कोणी म्हणे नंदलाला ॥2॥

कमरेला ते कासे पितांबर
हातामध्ये बासरी सुंदर
पायामध्ये सुवर्ण वाळे
चंदन टीळा लावला ॥3॥

बसावया तव रूई सम आसन
सूर्य किरणे उजळो ते तन
तेज पाहून हरपले मन
हर्ष तो खुलला ॥4॥

शरण आलो मी तुमच्या चरणा
भागवा ती माझी करूणा
चिरकाल ह्या भक्तासाठी
अनुग्रह द्या मजला ॥5॥

★★★★★